# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/घ.व्य./९२३ /2025-26
दि. ०५ /०५ /2025

प्रति,
1. **सिस्टीम मॅनेजर**
नागरी सुविधा केंद्र

2. **जनसंपर्क अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) प्रसिध्द करणेबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिका (MBMC) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2016 आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम 2022 अंतर्गत मनपा. क्षेत्रातील नागरीकांमार्फत देण्यात येणाऱ्या सुक्या कचऱ्याचे 6 प्रकारांमध्ये (कार्ड बोर्ड, प्लास्टीक पॅकेजींग मॅटेरियल/ बॉटल/फॅब्रीक, काच, धातु, लाकुड ई-वेस्ट) वर्गीकरण करणेसाठी साठी अनुभवी स्वयंसेवी संस्था, कंपन्या किंवा अन्य घटकांकडून स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात येत आहे.

उपरोक्त कामाची अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) महानगरपालिका संकेतस्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Z:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\TENDER FILE\JAN SAMPARK & system.docx

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे. - 401 101

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**


दि.०५/०५/2025

जा.क्र.मनपा/घ.व्य./१२३/2025-26

## // अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) सुचना //

मिरा-भाईंदर महानगरपालिका (MBMC) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2016 आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम 2022 अंतर्गत मनपा. क्षेत्रातील नागरीकांमार्फत देण्यात येणाऱ्या सुक्या कचऱ्याचे 6 प्रकारांमध्ये (कार्ड बोर्ड, प्लास्टीक पॅकेजींग मॅटेरियल/ बॉटल/फॅब्रीक, काच, धातु, लाकुड ई-वेस्ट) वर्गीकरण करणेसाठी साठी अनुभवी स्वयंसेवी संस्था, कंपन्या किंवा अन्य घटकांकडून स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात येत आहे.

ईच्छुक निविदाधारकांसाठी अभिव्यक्ती स्वारस्य कामी (Expression of Interest) सविस्तर तपशिल नमुना www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) ऑफलाईन दि. ०६ /05/2025 ते दि. १५ /05/2025 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) दि.१६/05/2025 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत उघडण्यात येईल.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Z:\Nirbhay Path\Public Health\Raj Documents\TENDER FILE\All Type Tender Notice.docx

Scanned with CamScanner

# स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest)

## मनपा. क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 04 मधील वॉर्ड क्र. 13 मध्ये प्रायोगिक तत्वावर सुका कचरा विलगीकरणाचा प्रकल्प राबविणे कामी एजन्सी नेमणुक करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका (MBMC) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2016 आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम 2022 अंतर्गत मनपा. क्षेत्रातील नागरीकांमार्फत देण्यात येणाऱ्या सुक्या कचऱ्याचे 6 प्रकारांमध्ये (कार्ड बोर्ड, प्लास्टीक पॅकेजींग मॅटेरियल/ बॉटल/फॅब्रीक, काच, धातु, लाकुड ई-वेस्ट) वर्गीकरण करणेसाठी साठी अनुभवी स्वयंसेवी संस्था, कंपन्या किंवा अन्य घटकांकडून स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागवत आहे. निवडलेली संस्था संपूर्ण सुविधा उभारणी, सुका कचऱ्याचे, प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्याची जबाबदारी घेईल.

**कामाची व्याप्ती :-**

मनपा. क्षेत्रातील नागरीकांमार्फत देण्यात येणाऱ्या सुक्या कचऱ्याचे 6 प्रकारांमध्ये (कार्ड बोर्ड, प्लास्टीक पॅकेजींग मॅटेरियल/ बॉटल/फॅब्रीक, काच, धातु, लाकुड ई-वेस्ट ) वर्गीकरण करणे आवश्यक आहे. याबाबतचे उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. सुका कचरा 06 प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे. (उदा: कार्ड बोर्ड, प्लास्टीक पॅकेजींग मॅटेरियल/ बॉटल/फॅब्रीक, काच, धातु, लाकुड, ई-वेस्ट इत्यादी)
2. टाकाऊ वस्तूंच्या पुर्नवापर आणि पुर्नचक्रीकरण प्रोत्साहन देणे.
3. लॅंडफिलमध्ये पाठवलेल्या कचऱ्याचे प्रमाण कमी करणे.
4. कचरा विलगीकरणाच्या महत्त्वाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे.
5. हाऊसकीपिंग कर्मचाऱ्यांना कचरा वर्गीकरण आणि व्यवस्थापन पद्धतींबद्दल शिक्षित आणि प्रशिक्षित करणे.

Scanned with CamScanner

**प्रशिक्षण आणि जागरूकता :**

वॉर्ड क्र. 13 मध्ये प्रायोगिक तत्वावर सुका कचरा विलगीकरणाबाबत सर्व सोसायट्यांमध्ये जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक असुन कचरा विलगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी माहितीपर स्टीकर्स, पोस्टर्स आणि बॅनर प्रदर्शित करणे, कचरा विलगीकरण आणि व्यवस्थापन पद्धतींवर क्षमता बांधणी कार्यशाळा आणि हाऊसकीपिंग कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे .

**पात्रता निकष :**

- कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर उपक्रमांमध्ये सिद्ध अनुभव.
- समुदायांसोबत काम करण्याची क्षमता व नागरिक-केंद्रित कार्यक्रम राबविण्याचा अनुभव.
- नैतिक पुनर्वापर सुविधांशी प्रवेश किंवा सहकार्य.
- कचऱ्याच्या संकलन व वाहतुकीसाठी पुरेसे लॉजिस्टिक संसाधने.

**प्रमुख जबाबदाऱ्या :**

1. सुविधा उभारणी : SWM नियम 2016 आणि PWM नियम 2022 चे पालन करून MRF यासारख्या प्लास्टिक कचरा प्रक्रिया सुविधा आवश्यक यंत्रसामग्री व पायाभूत सुविधा उभारणे.
2. प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व वाहतूक शहरभरात विविध संकलन बिंदूंवरून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करणे आणि ते प्रक्रिया सुविधेपर्यंत वाहून नेणे.
3. जागृती मोहीम: प्लास्टिक कचरा कमी करण्यासाठी, स्रोतावर कचरा वर्गीकरणासाठी, आणि PWM नियम 2022 अंतर्गत शाश्वत कचरा व्यवस्थापनाबाबत माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम राबविणे.

**आवश्यक कागदपत्रे:**

- कंपनी/संस्थेची प्रोफाइल.
- संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.
- पॅन कार्ड.
- जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
- मागील 03 वर्षांचे आयकर परतावा प्रमाणपत्र.
- घनकचरा व प्लास्टिक कचरा व्यवस्थापनात काम केल्याचे शासकीय व निमशासकीय अनुभवाचे प्रमाणपत्र.
- कंपनी/ संस्थेचे स्वत:चे वाहन पुरावा प्रत
- कंपनी/ संस्थेचा प्रकल्प ठाणे, मुंबई मध्ये असल्याबाबत पुरावा प्रत.

Scanned with CamScanner

**मूल्यांकन निकष:**

| अ.क्र. | तपशिल | एकुण गुण |
|---|---|---|
| 1 | अनुभव | संबंधित एक कामाचा - 20<br>संबंधित दोन कामाचा - 30<br>संबंधित तीन कामाचा - 50 |
| 2 | तांत्रिक कौशल्य (यंत्रसामुग्री, तांत्रिक मनुष्यबळ) | 25 |
| 3 | प्रात्यक्षिक/सादरीकरण | 25 |
| | **एकुण** | 100 |

**अटी व शर्ती:**

1. MBMC कोणतीही सादरीकरणे स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.
2. निवडलेली संस्था MBMC सोबत सामंजस्य करार (MoU) करेल.

**महत्त्वाच्या तारखा:**

**ऑफलाईन स्विकारणेची दि. ०६ /05/2025 ते दि. १५ /05/2025 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत.**

**अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) उघडण्याची दि.१६/05/2025 रोजी दुपारी 1.00 वाजता.**

**डॉ. सचिन बांगर**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner